लोकमत



चिलेवाडी येथे पाण्याच्या टाकीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी लीना देशपांडे, शहाजी क्षीरसागर उपस्थित होते.

# लोकोपयोगी कामे भारत फोर्सतर्फे करणार : देशपांडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**धामणेर :** 'गाव विकास प्रकल्पाच्या माध्यमातून डोंगराळ भागातील गावांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविण्याबरोबर आणि भारत फोर्ज कंपनीमार्फत लोकोपयोगी कामे हाती घेतले जातील,' अशी ग्वाही भारत फोर्ज कंपनी पुणे येथील सीएसआर विभागाच्या प्रमुख लीना देशपांडे यांनी काढले.

चिलेवाडी येथे कंपनीतर्फे पिण्याची पाण्याची टाकी व पाईपलाईन कामाचे लोकार्पणप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी धामणेरचे सरपंच शहाजी क्षीरसागर, जयदीप लाड, संतोष शेडगे उपस्थित होते.

लीना देशपांडे म्हणाल्या 'गावातील प्रत्येक घरांमध्ये पिण्याचे पाणी नळाद्वारे आल्यामुळे लोकांचे चेहरे प्रफुल्लीत झाल्याचे पाहून काम केल्याचे समाधान मिळते. डोंगर कपारीतील हे गाव असल्यामुळे विशेषतः महिलांचा पाण्याबाबतचा त्रास कमी होणार आहे.'

शहाजी क्षीरसागर म्हणाले, 'ग्रामीण विकासाला चालना देणारा या कंपनीने मोठा पाणी प्रश्न सोडवला असून, योग्य नियोजनाने विकासाचे कामे ही कंपनी करत आहे. सुमारे पन्नास हजार लिटरची पाणी साठवून टाकी असल्यामुळे भविष्यात रस्त्याला दुतर्फा पाण्याचे बॅलर उन्हाळ्यात दिसणार नाहीत. त्यामुळे ग्रामस्थांची गैरसोय दूर होणार आहे.' (वा.प्र.)

Hello Satara
Page No. 3 Oct 20, 2020
Powered by: erelego.com

## चिलेवाडी येथील पाण्याच्या टाकीचे लीना देशपांडे यांच्या हस्ते लोकार्पण



दै. कर्मयोगी २० ऑक्टोबर २०२०



## लोकोपयोगी कामे हाती घेतली जातील : देशपांडे